# अहा...! बहावा असा बहरला!



सोनेरी हे झुंबर झेले, अहा...! बहावा असा बहरला!
पुलकित झाले माझेही मन, आनंदच जणू असा पसरला!

हिरव्या शालीमधून विलसे तनू सोन्याची आरसपानी
रूप यौवना जणू उभी ही मोद विहरते गाते गाणी

हळूच वारा झोका देतो डौलाने बघ बसे पाखरू
एक पाकळी सुटून आली? की हा हळवा आनंदाश्रू?

नवं यौवनच हे सृष्टीचे चैत्राने बघ बहाल केले
की लक्ष्मीच्या वर्षावाचे स्वर्गातून हे देणे आले?


**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/